# तुमच्याकडून शिकण्यासारखे आणखी बरेच काही आहे, बिंद्राजी!

क्रिकेटचे आणि क्रिकेटशी संबंधित प्रत्येक गोष्टीचे अस्सल प्रेमी, ही- आता निवृत्त होण्याचा निर्णय घेतलेले माझे मित्र, मार्गदर्शक आणि असामान्य क्रिकेट प्रशासक यांची सर्वोत्तम ओळख ठरू शकेल. आज पंजाब क्रिकेट असोसिएशनमध्ये (पीसीए) जिचे रूपांतर झाले आहे त्या संस्थेला आकार देण्यात, बीसीसीआय, भारतीय क्रिकेट आणि अर्थातच आयसीसी व जागतिक क्रिकेटमध्ये योगदान देण्यात ३६ वर्षांच्या सक्रिय सहभागानंतर इंदरजित सिंह बिंद्रा यांनी या सभ्य गृहस्थांच्या खेळावर आपली चिरंतन छाप मागे ठेवली आहे.

एक कणखर क्रिकेट प्रशासक, स्वतंत्र वृत्तीचे आणि निर्भय व्यक्तिमत्त्व आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक अतिशय चांगली व्यक्ती अशा बिंद्राजी यांना भेटण्याचे आणि त्यांच्याबरोबरीने काम करण्याचे भाग्यच नव्हे तर अहोभाग्य मला लाभले. बिंद्राजी हे माझे मित्र, क्रिकेटच्या घडामोडींच्या संदर्भातील विश्वासू सहकारी आणि क्रिकेट प्रशासनाचे धडे ज्यांच्या हाताखाली गिरवले असे मार्गदर्शक होते, त्यांनी मला आपल्या पंखाखाली घेऊन मला जे ज्ञान दिले त्यामुळेच मी या खेळाशी जोडला गेलो. आपल्या लाडक्या खेळात काही चुकीचे घडत असेल तर हातावर हात ठेवून स्वस्थ बसून राहणाऱ्यांपैकी बिंद्राजी नसल्यामुळे ते बीसीसीआयच्या कारभारात अनेकदा कशा ना कशाच्या विरुद्ध उभे ठाकलेले दिसत; पण, ज्यावर त्यांचा विश्वास आहे, अशा कोणत्याही गोष्टीतून त्यांनी कधी माघार घेतलेली मी पाहिली नाही.

मी बिंद्राजींच्या सोबत पीसीएच्या मोहाली येथील ख्यातनाम दालनामध्ये व्यतीत केलेल्या काळाच्या इतक्या रम्य आठवणी माझ्या मनात आहेत की ते या खेळापासून दूर जात आहेत, ही कल्पनाही मी करू शकत नाही. आणखी महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीसीए आणि भारतीय क्रिकेट बळकट होत चाललेले मी पाहिले आहे. पीसीएकडे माझ्या मते भारतातील एक सर्वोत्तम आणि जागतिक दर्जाचे स्टेडियम आहे. त्यामुळेच बिंद्राजींच्या लाडक्या पीसीए स्टेडियममध्ये २०११च्या वर्ल्ड कपमधील भारत विरुद्ध पाकिस्तान हा सेमीफायनलचा सामना खेळवला जाणे, हा माझ्या मते बिंद्राजींच्या देदीप्यमान कारकीर्दीच्या शिरपेचातील तुरा होता.

मात्र, त्यांच्या कारकिर्दीच्या कोंदणातील पीसीए या हिऱ्याव्यतिरिक्तही त्यांनी अनेक लक्षणीय उपक्रम यशस्वी केलेले आहेत, यातूनच आपल्या लाडक्या खेळाच्या आणि

क्रिकेटपटूंच्या हितासाठी अथक झटणाऱ्या या माणसाचा मोठेपणा स्पष्ट होतो. ज्यांनी या खेळाचे मोल ओळखले आणि त्याला त्याच्या सर्व सुप्त सामर्थ्यांने उभे करण्यासाठी त्याचे अचूक मार्केटिंग केले अशा अग्रणींमध्ये मी बिंद्राजींचा समावेश करेन. भारतीय क्रिकेटची टेलिव्हिजन बाजारपेठ खुली करण्यातून होणारे प्रचंड फायदे ज्यांच्या लक्षात आले होते, अशा भारतीय क्रिकेटमधील काही मोजक्या प्रशासकांमध्ये ते होते आणि याच काळात मी बीसीसीआयच्या जगात प्रवेश करून त्यांच्याबरोबर बरेच काम केले.

खरेतर माझी क्रीडा प्रशासनातील कारकीर्द त्यांच्या टेबलाच्या विरुद्ध बाजूला झाली असली, तरी त्यांची-माझी भेट जणू कालच झाली असावी, असे मला वाटते. मी भारतात स्पोर्ट्स पे चॅनेल्सचे वितरण करण्याचा व्यवसाय उभा करण्याच्या प्रयत्नात होतो. क्रीडा व्यवसाय हा सर्व जातधर्मांच्या पलीकडे जाणारा आणि इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा वेगळा व्यवसाय आहे, हे फार पूर्वीच ज्यांच्या लक्षात आले होते, असे बिंद्राजी हे एकमेव होते, असे मला वाटते. म्हणूनच त्यांनी मला ईएसपीएन आणि टेन स्पोर्ट्सच्या माध्यमातून क्रिकेटच्या टीव्ही प्रक्षेपणाचा भारतात या प्रकारे शुभारंभ करण्यात मदत केली.

'लाइव्ह स्पोर्ट्स' ही संकल्पना भारतीय टेलिव्हिजन प्रेक्षकांच्या मनात लवकर भिनेल आणि ते त्यासाठी पैसे मोजायला तयार होतील, हे त्या काळातही बिंद्राजींच्या लक्षात आले होते. दोन दशकांपूर्वीच्या त्या काळात प्रसारणाच्या हक्कांची खरी किंमत फक्त बिंद्राजी आणि फार फार तर श्री. दालमिया या दोघांनाच समजली होती.

मला अगदी स्पष्टपणे आठवते की मी ईएसपीएनच्या माध्यमातून इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड, बीसीसीआय, क्रिकेट ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड क्रिकेट, वेस्ट इंडीज आणि श्रीलंका यांच्याकडे प्रसारण हक्क विकत घेण्यासाठी गेलो होतो. बिंद्राजींनी तेव्हा मला सांगितले होते की मी भारतीय क्रिकेटला मदत करू शकतो आणि कोणतीही व्यवस्था सुधारण्याचा माझ्यासाठी सर्वोत्तम मार्ग हा त्या व्यवस्थेचा भाग बनून आतून ती व्यवस्था सुधारण्याचा असेल.

माझा भारतीय क्रिकेटबरोबरचा प्रवास खऱ्या अर्थाने तेव्हाच सुरू झाला. बीसीसीआय आणि सगळ्या जगासमोर जेव्हा मी इंडियन प्रीमियर लीगची (आयपीएल) कल्पना मांडली, तेव्हा ते माझ्यासोबतच होते. दिवस असो की रात्र- त्यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी केवळ एका फोन कॉलच्या अंतरावर होते. आयसीसीचे प्रधान सल्लागार म्हणून त्यांनी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि चीन या दोन देशांचा दौरा केला आणि जगातील या दोन सर्वात

मोठ्या बाजारपेठांमध्ये या खेळाचा प्रसार करण्याचा मसुदा तयार केला, तेही काम त्यांच्या फार आवडीचे होते.

आज हे लिहीत असताना माझे मन वारंवार या भव्य व्यक्तिमत्त्वाच्या माणसाने क्रिकेटमध्ये वेगवेगळ्या उपक्रमांमधून आपले जे चिरंतन योगदान मागे ठेवलेले आहे, त्याकडेच वळते आहे.

बिंद्राजींच्या नसण्याने भारतीय क्रिकेटचे मोठे नुकसान होणार आहे. कारण, असामान्य क्रिकेट प्रशासक म्हणून त्यांची जागा भरून काढणे हे फार अवघड आहे. मी त्यांना सदिच्छा देतो आणि केवळ मलाच नव्हे, तर भारतीय क्रिकेट यंत्रणेत सुधारणा करू इच्छिणाऱ्या कोणालाही जेव्हा काही मदत किंवा मार्गदर्शन हवे असेल, तेव्हा ते कायमच त्यासाठी उपलब्ध असतील, हे मला माहिती आहे.

बीसीसीआयमधील घडामोडींवरील माझी मते-विचार जाणून घेण्यासाठी माझ्या ट्विटरवरील @lalitkmodi या अकाऊंटला फॉलो करा.